
१९९६
म. ग्रं. सं. ठाणें
काव्य
१३५८
REFBK-0006778
REFBK-0006778




स्वातंत्र्यवीर

# सावरकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 29383 वि: काव्य
क्रमांक 7354 नों: दि:

# चाफेकर नि रानडे यांजवर फटका

REFBK-0006778

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
6778

## स्वातंत्र्यवीर सावरकर

मुद्रक :
**वि. पु. भागवत**
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी गिरगांव, मुंबई ४.

प्र थ मा वृ त्ति
१ ९ ४ ६
**मूल्य ६ आणे**

प्रकाशक :
**गो. रा. पाटणकर**
कॉन्टिनेंटल बुक सर्व्हिस
६२६, शनिवार पेठ, पुणें २

स्थलमत.
अनुक्रम 29383 वि. ३/८४
क्रमांक 7354 नों: दि: 24/11/86

# प्रास्ताविक

'चाफेकरांचा फटका' ही वीर सावरकरांची कविता रचली गेल्या-नंतर आज उण्यापुऱ्या पन्नास वर्षांनीं प्रथमच मुद्रिली जात आहे.

हा फटका चाफेकर नि रानडे फांशी गेल्याची बातमी येताच सन १८९९ चे मध्यंतरांत रचला गेला. त्यावेळीं वीर सावरकरांचें वय अवघें सोळा-सतरा वर्षांचें होतें !

वीर सावरकरांच्या वडिलांना 'अण्णासाहेब' म्हणत. ते त्या वेळच्या टिळकपक्षीय राजकारणाचे अभिमानी होते. त्यांच्या भगूर येथील 'नव्या वाड्या'चे बैठकींत, त्यांच्या गांवची नि त्यांच्या आजूबाजूच्या गांवची पाटील, शेटजी, शेतकरी, शिक्षक इत्यादि वर्गांतील त्यांची इष्टमित्रमंडळी जेव्हां जमे; तेव्हां 'केसरी', 'जगद्धितेच्छु,' 'पुणें वैभव' नि नवीनच निघालेला आणि तात्यांचा-कुमार सावरकरांचा-आवडता 'काळ' इत्यादि पत्रें वाचलीं जात, चर्चिलीं जात. त्या काळीं प्लेगनें देशभर प्रथमच भयंकर कहर उडविला होता. त्या प्लेगचीं वर्णनें, सरकारची दडपशाही, रँडचा वध, लो. टिळकांचा खटला नि शिक्षा, चाफेकर-रानड्यांचे खटले नि त्यांना झालेल्या फांशीच्या शिक्षा इत्यादि उत्क्षोभक बातम्या एकामागून एक येत गेल्यानें सर्वच जनतेंत त्या वाचल्या जातांच जशी खळबळ उडत जाई तशीच अण्णारावांच्या या छोट्याशा बैठकींतही उडे. त्या बैठकींत हीं वर्तमानपत्रें वाचून दाखविण्याचें काम अलीकडे कुमार सावरकरांकडे सोंपविलेलें होतें. चर्चेमध्यें तर कुमार सावरकर इतक्या त्वेषानें परकीय सरकारवर तुटून पडत आणि चाफे-करांच्या कृत्यांचें नि क्रांतिप्रवणतेचें इतक्या आग्रहानें समर्थन करीत कीं, त्यांच्या वडिलांनीं असें उघडउघड न बोलण्याविषयीं आपल्या त्या तिखट मुलास एकान्तांत प्रेमानें समजावून सांगावें !— परंतु त्या

कुमाराचें मन 'चाफेकरांसारखें कांहीं तरी करावें' अशा उग्र विचारांनीं भारून गेलें तें गेलेंच.

ज्या दिवशीं चाफेकर-रानड्यांना शेवटीं फांशी चढविल्याची वार्ता आली, त्या पुढच्या एक दोन दिवसांतच कुमार सावरकरांनीं त्यांची कुलस्वामिनी असलेल्या अष्टभुजा देवीपुढें प्रतिज्ञा केली कीं, "चाफेकरांचें अपूर्ण राहिलेलें कार्य मी पुढें चालवीन ! माझ्या देशाला स्वतंत्र करण्यासाठीं मी सशस्त्र क्रांतीची उठावणी करीन ! !"

सावरकरांच्या बालवयांतील या उग्र प्रतिज्ञेचा पडसाद, गाभाऱ्यांत वेदघोषाचा पडसाद उठावा त्याप्रमाणें, त्याच वेळीं रचलेल्या या फटक्यांतील खालील ओळींतही उठत आहेः—

कार्य सोडुनी अपुरें पडतां झुंजत ? खंती नको ! पुढें ॥
कार्य चालवूं गिरवित तुमच्या परामक्रांचे अम्ही धडे ॥ १ ॥

कुमार सावरकरांनीं चाफेकरप्रकरणावर एक नाटिकाहि रचिली होती. त्या गांवांतील तमासगीरांपैकीं राणूशेट शिंपी यांचा जो प्रमुख फड होता त्यांतील सावरकरांच्या बालमंडळीपैकीं परशुराम नि राजाराम शिंपी यांच्या खटपटीमुळें त्या फडानें ती नाटिका बसविली. आतां खेळ व्हायचा, तों गांवच्या पाटील-कुळकर्ण्यांना ती वार्ता कळली. तेव्हां कांहीं धाक दाखवून, कांहीं गोडीगुलाबीनें त्यांनीं तो बेत रद्द करविला आणि गांवावर येणाऱ्या या 'नसत्या अरिष्टा'पासून गांव बचावलें.

या चळवळीमुळें कुमार सावरकरांच्या वडिलांना आपल्या आवडत्या नि होतकरू मुलाचें हें प्रकट होऊं लागलेलें तेज, बुद्धि, प्रखर देशभक्ति आणि वीरवृत्ति पाहून मनांत अत्यंत कौतुक नि अभिमान वाटे पण हृदयांत ह्या त्याच्या धाडसीपणामुळें केव्हां काय संकट ओढवेल त्याची चिंता लागून धस्स होई. आपल्या वडिलांची चिंतातुर मुद्रा पाहून त्या मुलालाहि वाईट वाटे. यासाठीं जेव्हां हा फटका कुमार

सावरकरांनीं रचावयास घेतला तेव्हां तो बेत त्यांनीं वडिलांना कळविला नाहीं. रात्रीं सगळे निजले म्हणजे 'नव्या वाड्यां' तील बंगल्यांत झोपाळयावर बसून अंधेरांतच मनामनाशीं ओळी रचाव्या आणि झटकन् दिवा लावून तेवढ्या ओळी कागदावर उतरून लगेच दिवा विझवून टाकावा असा त्यांनीं क्रम ठेवला. पण एका रात्रीं अण्णा सहज उठले नि दिवा कोणी लावला म्हणून पाहावयाला वर आले. तों त्यांनीं पाहिलें, आपला मुलगा तन्मय होऊन कांहीं तरी लिहीत आहे ! कागद उचलून पाहातात तों "चाफेकराचा फटका" ! अण्णा न रागावतां पण कळकळीनें मुलाला समजावूं लागले, "हें पहा तूं अजून लहान आहेस. आपलें कुटुंब म्हणजे एका खांबावर उभी असलेली द्वारका ! तूं पुढें थोरपण पावशील, आमचे पांग फेडशील, या आशेवर मी दिवस कंठीत आहें. पण तूं अशा भयंकर नादापायीं आपल्या कुटुंबावर अकस्मात् एखादें प्राणसंकट ओढवून घेशील. म्हणून सध्यां तूं हा असमय आणि अपक्व खटाटोप सोडून दे. पुढें मोठा झालास, बुद्धि प्रगल्भ झाली म्हणजे काय भवितव्यता असेल तें घडेल !"

चार पांच महिन्यांचे आंतच कुमार सावरकरांवरील तें पितृप्रेमाचें छत्रहि मोडून पडलें ! त्यांचे वडील प्लेगमध्यें वारले ! सबंध कुटुंबच प्लेगच्या कहरांत वाताहत झालें. प्लेगच्या ह्या संकटाला तोंड देण्यांत सावरकरकुटुंब गुंतल्यामुळें पुढें एक वर्षभर ह्या फटक्याकडे कोणासहि लक्ष्य देण्यास झालें नाहीं.

पुढें सावरकरांचें कुटुंब नाशिकला येऊन राहिल्यानंतर त्या फटक्याचा प्रचार चालू झाला. अनेक बैठकींतून सावरकर तो स्वतः म्हणत. नाशिकला येणाजाणाऱ्या बाहेरगांवच्या नि पुण्यामुंबईच्या कित्येक मंडळींनाहि ह्याचा चटका लागून तो फटका त्यांनीं उतरून न्यावा, पाठ करावा आणि तेथल्या तेथल्या समाजांत अंतस्थपणें म्हणून दाखवावा.

शब्दालंकारांनीं नि अर्थालंकारांनीं इतका रसरसलेला आणि क्रांति-

कारक आवेशानें भरलेला हा फटका कुमार सावरकरांनीं सोळा–सतराव्या वर्षीच रचावा याचें आजहि जें कौतुक वाटतें. त्याच्या दसपट कौतुक त्या वेळच्या राजकीय परिस्थितींत शतावधि तरुणांनाच नव्हे तर नामांकित कवींना आणि पुढाऱ्यांनाहि वाटावें हें सहाजिकच होतें. कुमार सावरकरांनींच स्थापलेल्या गुप्त संस्थेची उघड प्रचाराची ‘ मित्र मेळा ’ ही शाखा होती. त्या शाखेंतील कै. वामनराव खरे, म्हसकर, पागे प्रभृति अनेक प्रौढ नि प्रतिष्ठित मंडळींच्याहि मनांत हा फटका छापावा असें वारंवार येऊं लागलें. परंतु ज्या काळांत कांहीं मोठमोठे राजकीय नेतेहि मनांत नसतांनासुद्धां आणि बरेचजण मनापासूनच चाफेकर–रानड्यांना आततायी, नीच “ राजनिष्ठ, सौजन्यशील नि सात्विक ” अशा हिंदुजातीस कलंक लावणारे इत्यादि वेंचक शिव्या हांसडीत सभांतून नि वृत्तपत्रांतून निषेधाचा विषारी पाऊस पाडीत होते आणि परकी सरकार पिसाळून जाऊन ज्याला त्याला चावत सुटलें होतें,— त्या १९००–१९०१ च्या काळांत चाफेकर–रानड्यांना ‘ राष्ट्रवीराग्रणी ’ आणि ‘ अनुकरणार्ह ’ म्हणून इतक्या उत्कटपणें अभिनंदणारा हा फटका छापणें ही गोष्ट मुळांतच दुर्घट होती ! छापून देणारा तरी कोण मिळणार ! तेव्हां हा फटका मूळ धोरण न सोडतां, शक्य तों सौम्य करून देण्यासाठीं ह्या मंडळींनीं सावरकरांना सांगितलें. त्यांनींहि कांहीं फेरफार नि गाळागाळी करून तो शक्य तों सौम्य केला. पण तिखटाच्या पाळ्यांतून कांहीं तिखट काढलें तरी उरलेलें तें तिखटच्च असणार ! तरीसुद्धां ही सौम्यप्रत सुविख्यात “ काळकर्ते ” यांजकडे अंतस्थपणें धाडावी आणि छापावी किंवा काय या दृष्टीनें अभिप्राय विचारावा, असें ठरलें. त्याप्रमाणें श्री. म्हसकर यांनीं ती प्रत धाडली. काळकर्त्यांनीं त्या कवितेची आणि त्या वेळेस ओळख नसलेल्या त्या बालकवीची उचित तितकी वाखाणणी करूनहि ती कविता छापणें त्या परिस्थितींत अनिष्ट आहे असें मत दिल्याचें म्हसकरांनीं मंडळींना सांगितलें.

याच सौम्य प्रतीचे वेळीं मूळ फटक्यांत सावरकरांनीं अंतींच्या चरणांतील आपलें सरळ घातलेलें नांव बदललें आणि चित्रकाव्याचा

आश्रय करून तें शेवटच्या चारपांच ओळींत कूटस्थपणें गोविलें. आज प्रसिद्ध होत असलेल्या या फटक्यांत शेवटच्या चारपांच ओळींत ठळक अक्षरांमध्यें तें नांव प्रकट करून छापलें आहे.

पुढें छापण्यासाठींच म्हणून रचलेले सावरकरांचे पोवाडेहि जेव्हां घडाघड जप्त होऊं लागले तेव्हां या फटक्याची 'सौम्य' प्रतही छापण्याचें नांवच काढणें अशक्य झालें. तथापि त्याचा प्रचार वाढतच गेला. लग्नसमारंभ, उत्सव, संम्मेलनें इत्यादि प्रसंगीं निवडक बैठकींतून हा फटका ठिकठिकाणीं म्हटला जाई. फर्ग्युसन कॉलेजमध्यें सम्मेलनादि प्रसंगीं स्वतः तरुण सावरकर हा फटका म्हणत असतां श्रोत्यांत क्रांतिशील आवेश आणि स्फूर्ति कशी संचरत असे तें प्रत्यक्ष अनुभवानें सांगणारी मंडळी सुदैवानें आजहि विद्यमान आहेत. जेव्हां मधून मधून धरपकडींचीं सत्रें चालू होत तेव्हां या फटक्याची तुरळक प्रत कोणाजवळ सांपडली किंवा हा फटका म्हणत असतां कोणी धरले गेले तर ती गोष्ट ते गृहस्थ क्रांतिकारक असल्याचा एक बळकट पुरावा म्हणून गणली जाई ! परंतु असले धोके पत्करूनहि शतावधि स्त्रीपुरुषांनीं गुप्तपणें प्रती करून, तोंडपाठ करून, पिढीमागून पिढीचे जिव्हेवर आज पन्नास वर्षें तो फटका जिवंत ठेवलेला आहे ! महाराष्ट्रांतील जनतेच्या मनावर एकंदर सावरकरसाहित्यानें केवढी छाप पाडलेली आहे याचें त्यांची ही बालवयांतील कविताहि एक प्रत्यंतरच होय.

आश्चर्य हें कीं, छापण्यासाठींच म्हणून जे अगदीं जपून रचिले ते सावरकरांचे सिंहगडादिक पोवाडे छापले म्हणूनच जप्त झाले ! परंतु जप्तीची लवलेशहि क्षिति न बाळगतां रचलेला आणि इतका शस्त्राचारप्रवण नि क्रांतिशील असणारा हा फटका छापतांसुद्धां आला नाहीं; म्हणूनच केव्हांहि रीतसर जप्त झाला नाहीं !

अनेक वर्षें अनेकांकडून तोंडी म्हटला गेल्यानें नि गुप्तपणें प्रतीविला गेल्यानें ह्या फटक्यांत कित्येक पाठांतरें आढळलीं. तीं संकलून नि समन्वयून ही शुद्ध प्रत छापली जात आहे. आज उण्यापुऱ्या पन्नास

वर्षांनंतर हा फटका प्रथमच छापण्याचा मान आम्हांस मिळाला, हें आम्हीं आमचें भाग्य समजतों.

वीरवर चाफेकरबन्धु नि रानडे हे सन १८९८-९९ वर्षांच्या मध्यंतरांत एकामागून एक फांशी गेले. महाराष्ट्रसाहित्यांत त्यांच्या राष्ट्रीय आत्माहुतीची आज ही एकच वीरगाथा-स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं बालवयांत रचलेला फटका-उपलब्ध आहे. ती चाफेकर-रानड्यांची वीरगाथा त्याच हुतात्म्यांच्या वीरस्मृतीस आम्हीं आज सादर समर्पितों !

दिनांक ८—११—४६ **प्रकाशक**

अनुक्र. २९३८३ वि. ...
क्रमांक ९३५८ नों: दि: २५/...

# चाफेकर नि रानडे यांजवर फटका

दा. क्र. ~~४६२१~~ ४६७८

— १ —

महच्चरित सत्सुधांबुधीमाधिं करूं सुमन हें पाणबुडें ॥
अखंड–सद्‌गुणमण्डित मौक्तिक निधान सयश मग उघडे ॥ ध्रु० ॥

हांगकांगहुनि ठिणगि उडोनी गांठी अवचित मुंबइला ॥
अपूर्व अवचित अघोर रूपें प्लेगहुताशन संचरला ॥ १ ॥
हाय ! बाप ! हा ! अरेरे ! करी गाइ ! अगाई ! नरमहिला ॥
भयाण शब्दश्रवणें शेषहि टाकूं पाही धृत महिला ॥ २ ॥
युवतीस्फुंदन वृद्धाक्रंदन तो प्राणांतिक कण्ह यांहीं ॥
भुतें भयंकर किंकाळति त्या भयासही जें भयदायी ॥ ३ ॥
काळापरिसहि काळहृदय तो विषापरिसही विषारि तो ॥
पवनापरिसाहि जवन असोनि गिरिपरि अचलत्वा धरितो ॥ ४ ॥
भारतभूचें कुंकुम केलिस स्वतंत्रता जिथ पावतसे ॥
धन्य अशा श्रीपुण्यपत्तना पहावया हा धावतसे ॥ ५ ॥
असमानाची खोड मोडण्या सुलतानाचे मनिं भरलें ॥
प्रजाहिताहित मुळिं न पाहतां कडक कायदे बहु ठरले ॥ ६ ॥
प्लेगनिवारक नियम परी ते संवर्धनकाचि त्या असती ॥
लोकमतिस त्या ब्रिटिश न मानी सती–वच जसें ती असती ॥७॥
प्रदीप्त ऐशा प्लेग–पावकीं काय कायदा आज्य पडे ॥
रँड–वायु हा हाहाःकाराचि करीत सुटला चहूंकडे ॥ ८ ॥

— २ —

हां हां म्हणतां क्षणाभीतरीं असंख्य गवसति काळ-करीं ॥
उदास दुःखित जनांस छळुनी न्यायाची पर राळ करी ॥ १ ॥
प्रेताजवळीं गिधाड धडके तसा त्वरेनें धांवतसे ॥
भुतावलीसम मृतालयातें सोजिरगण हा पावतसे ॥ २ ॥
क्रौर्यें उद्धत शुद्ध भैरवचि मद्यधुंदिनें धुंद सदा ॥
आप्तवियोगें युक्तजनातें सक्तभापणें छळति तदा ॥ ३ ॥
प्लेग मृतातें असो वा नसो वसोंच परि धनि अटकावी ॥
शिरा घरामधिं करा लूट हो कोण तुम्हाला हटकावी ॥ ४ ॥
हवे ते गृहीं सर्वेंच शिरती धन्या पकडती हे वरतीं ॥
हव्या वस्तुतें लुबाडोनियां निरंकुशत्वें वावरती ॥ ५ ॥
जया मंदिरीं पाय टाकितां म्लेंच्छ तच्छिरा छाटविती ॥
हा ! हा ! उद्धट सोजिर त्यांसी डोळ्या देखत बाटविती ॥ ६ ॥
पतिव्रतांतें कुठें गांठुनी बाटविती हे हाय ! अरे ! ॥
अधमाधम हो ! काळ स्थिर नसे सव्याज मुद्दल देउं बरें ॥ ७ ॥
आर्यां छळितां खुशाल माता तुम्हांस आतां माज चढे ॥
परंतु होतां प्रकट नृसिंहहि लपाल जंबुक कुणीकडे ॥ ८ ॥

— ३ —

हाल हाल बहुकाल करोनि चार मांडिले हवे तसे ॥
छळुनि सोडिली सकल प्रजा मग ‘ खून ’ पडे हें नवल नसे ॥ १ ॥
अबलाबाला बालांचे ह्या शाप सहस्रावधि होती ॥
करितां गमते कृती गोड जी भरितां कडवट कां होती ? ॥ २ ॥
धर्माज्ञेला ईशाज्ञेला समाज–कर्तव्याला हो ॥
पाळोनीयां प्राणा द्याया सिद्ध, तयांचा शुभ लाहो ॥ ३ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

स्वजनछळाला ऐकुनी होती तप्त तरुण ते अरुण जणो ॥
देशासाठीं प्राणा देती धन्य धन्य त्यां कां न म्हणों ? ॥ ४ ॥
परस्परांमधिं विचार करिती उपाय वदती मग सुचला ॥
अरे, रँड हा अधम, ह्यासची वधूं चला रे चला चला ॥ ५ ॥
अरे, कांच हा मनीं डांचतो, जाच असह्यच लोकांना ॥
पोचट देखुनि नाचविती हे काळ भासती कैकांना ॥ ६ ॥
शतावधी ते जन्मा येती मरोनि जाती ना गणती ॥
देशासाठीं मरती त्यांसी देशपिते कीं बुध म्हणती ॥ ७ ॥
वरूं वरूं झडकरी मरण तें अमरची जरी असें घडे ॥
अनोन्यांमधिं बोलति कीं मग गरुडपतींची जोड जडे ॥ ८ ॥

– ४ –

विनयशालिनी विनयधारिणी आंग्लां म्हणाति कीं यशवंती ॥
राणी त्यांची 'विजया' विजयी भाग्यशालिनी एवं ती ॥१ ॥
चिरायुरारोग्याला भोगी तिचा महोत्सव ते करिती ॥
योग्यचि समया छळक वधाया मुहूर्त सारे हे धरिती ॥ २ ॥
स्वजन–छलन–हरणाला झाले सज्ज अर्पण्या देहाला ॥
मोहाला ठोकुनी प्रणामा, निघती त्यागुनि गेहाला ॥ ३ ॥
वीरश्रीनें शोभित झाली सत्यपालनें हर्षवती ॥
तारुण्यानें सतेज, दैवी स्फूर्ति संचरे हृदिं नव ती ॥ ४ ॥
लालभडक ते नेत्र, बंधुवर बाळकृष्ण दे धीर मना ॥
श्रीदामोदर सिद्ध जाहला जायालागीं खलदमना ॥ ५ ॥
कान्ता वदली, " कान्ता, जातां देशहिताला करावया ॥
पतिराया, द्या निरोप जावें त्वरित कीर्तिला वरावया " ॥ ६ ॥

पवन जवन परि मागें सारित 'गणेशखिंडि' प्रति आला ॥
कालासम मग समया साधितो घालायाला तो घाला ॥ ७ ॥
भक्ष्य **रँड** बहु मस्त देखतां सिंह धावला बगीकडे ॥
गोळी सुटली, गडबड मिटली, दुष्ट नराधम चीत पडे ॥ ८ ॥

– ५ –

आजवरी किति तरी मारिती म्लेंच्छमदानें वदा प्रजा ॥
सजा न त्यांना मुळीं होय हे न्यायदेवते काय मजा ॥ १ ॥
परी पहा तो राजदूत ना प्लेगदूत जनछळ करितो ॥
भरितो प्रायश्चित्त ठीक जैं कोण कोप हा पर धरितो ॥ २ ॥
योग ईश्वरी किंवा रँडचि दृढसंकल्पी खरा असे ॥
पिसें करितसे मेल्यावरही होत सळो का पळो असें ॥ ३ ॥
पिसाळलें 'सरकार' खुनानें वसकन् डसलें भल्या भल्या ॥
भल्या अर्पिल्या सुमनांजलि ज्या शतकोशतकीं न लाभल्या ॥ ४ ॥
कधीं फडकले जादा पोलिस, कधीं पकडलें नातूंना ॥
जलीं स्थलीं त्या दिसूं लागला रँडवधासह तो 'पूना' ॥ ५ ॥
देशवीर महाराज शूर श्री **टिळक** तयांचें क्षेम असो ॥
खरा हिरा हा कसासि उतरे काळभीति 'बाळा'सि नसो ॥ ६ ॥
सायंकालीं सर्वे चमकती बहुत काजवे आणि शशी ॥
तशाच न्यायें टिळक-सुधाकर ठरत तोलतां इतरांशीं ॥ ७ ॥
रणांगणावरि खरे राहतिल कितीक ठोकुनि दंड खडे ॥
तसेच असती देशद्रोही कवण तोहि उलगडा पडे ॥ ८ ॥

– ६ –

'फितुर' 'फूट' ही दुष्ट जनांच्या पाव्यावरतीं पूजियली ॥
नष्ट अक्षरें कष्टमय जिहीं राष्ट्रदेवि बहु गांजियली ॥ १ ॥

क्र. २९३८३ दि. ३/०...
क्रमांक ....२३४५८.... नों: दि: २.४...

द्रवीडबंधू द्राड श्वान जे स्वोदरपूर्तिस्तव नाना ॥
चार आचरिती फितुरि कराया शरम वाटली यांना ना॥ २ ॥
देशासाठीं झटति शूर जे, पकडुनि द्याया नरवर तीं ॥
सिद्ध होउनी अनर्थकारी दहा सहस्रां सांवरती ॥ ३ ॥
सकळांच्या डोळ्यांत येउनी प्राणकंटका वरि धरिला ॥
वरिला रे फायदा काय तरि नित्य अकीर्ति–ध्वज पुरला ॥ ४ ॥
छळक छळ करी परी मजा कीं वरी कीर्ति जो छळलेला ॥
चाफेकर यश–यत्न झळकती द्रवीड अंधःकार मला ॥ ५ ॥
श्री चाफेकर त्वरें अटकले फरासखान्यामाझारीं ॥
तदा अंतरीं करिति विचारा, "कबूल व्हा धडगती तरी ॥ ६ ॥
ज्याच्यासाठीं प्राणसंकटीं लोटियलें म्यां उठाउठीं ॥
कठिण काळ मद्देशबंधुजन मत्कृत्यांस्तव कां कंठी ? ॥ ७ ॥
सज्जन संघावरी कोसळति दुःखाद्रींचे थोर कडे ॥
दहा जणांच्या हितार्थ जाऊं एक काय मग त्यांत नडे !" ॥ ८ ॥

– ७ –

हांजी हांजी करी सर्वदा राजी म्लेंच्छांच्या कृतिला ॥
पोटासाठीं खटपटतो परि तुष्ट गमे पर भूपतिला ॥ १ ॥
पारतंत्र्यपंकांत देश जो बुडवी त्या प्रति नृप म्हणती ॥
कडक दंड जो दे त्या छलका राजद्रोही त्या म्हणती ॥ २ ॥
उदात्त ज्याचे विचार, धाडस विशाल, देशप्रीति मनीं ॥
खुनी बनत तो न्याय–प्रहसनीं, हाय ! हाय ! मग होत जनीं ॥ ३ ॥
तिळहि नसे कीं फांशी झाली यामधिं दुःखाला वसती ॥
देशपिता त्या खुनी म्हणतसां ह्यासाचि सज्जन बहु हंसती ॥ ४ ॥

न्यायाधिश हा जोशी उत्तम उदयमुहूर्ता योग्य गणी ॥
सत्य, देशहित, वऱ्हाड जमलें कीर्तिनीति ह्या वऱ्हाडणी ॥ ५ ॥
टिळक–गजानन नमस्कारिला फांस–बोहलें मग पुरलें ॥
स्मरले गीतामंत्र 'दामुनें' मुक्ति नवरिला हो वरिलें ॥ ६ ॥
लग्न–सोहळा विचित्र दावी चित्र भीतिचें किती बडें ॥
सूड उगविण्या वासुदेवहृदयांत भयकर कोप चढे ॥ ७ ॥

– ८ –

द्रवीड कोपें दाह होतसे ज्वाला नेत्रांतुनि सुटती ।
लाही झाली दाहि दिशातें 'सूड' अक्षरें हीं उठती ॥ १ ॥
करकर चावी अधर, चोळितो करांसि, निश्चल पळ बसला ॥
'सूड' शब्द कर्णांत गुंगतो, वासुदेव मग स्मित हंसला ॥ २ ॥
बोले, "मत्ता मशका, दुखवुनि सिंह सुटाया धडपडशी ॥
यमनगरीला बदली करितों उचल जलद चल तव पडशी ॥ ३ ॥
चिरुन तुझ्या देहास करिन शतखंड पुन्हाही विखंड हा ॥
दंडम रेड्या डंवचळलासी गड्या, व्याघ्र त्वां प्रचंड हा ॥ ४ ॥
सत्यदेश–हितकर्ता जो कां चोरा, छळिलें त्या थोरा ॥
अधम कृतघ्ना, लांच खाउनी जाहलासि मम भाग खरा" ॥ ५ ॥
श्रीचाफेकर तसे रानडे मित्र परस्पर ते होते ॥
द्रविड–होम–निश्चया ठरवुनी उभय जाहले मग होते ॥ ६ ॥
अधम शांति सिद्ध्यर्थ बांधिलें धाडस कंकण शुद्ध सदा ॥
स्नेहबांधवप्रेमा ऋत्विज् चपल असिलता दर्भ तदा ॥ ७ ॥
कोप–हुताशन भडाड भडके द्रवीड पूर्णाहूति पडे ॥
झालें अवभृथस्नान रुधिर जलिं घोर प्रतिज्ञा सिद्धि घडे ॥ ८ ॥

— ९ —

छळित परोपरि गरिब जनाला म्लेंच्छ पुनरपी या समया ॥
तया भिउनियां स्वयें सांगती जन–माया जनकासम या ॥ १ ॥
“ सूड उगविण्या प्रिय बंधूंचा द्रविडवधाला करणारा ॥
वासुदेव तो मींच होय जो सज्जनछलना हरणारा ॥ २ ॥
मित्रालागीं लागोपाठीं गांठी द्रविडा अधमाला ॥
मींच रानडे सुमित्रापुढें कस्पटसम मत्प्राण मला ” ॥ ३ ॥
न्याय–नाटकीं थाट उडाला वाट ना मिळे रातिभर ती ॥
मूर्ति मनोहर अवलोकुनियां जनकुतूहला ये भरती ॥ ४ ॥
चकित टकमकां सर्व पाहती धन्यचि छाती मग म्हणती ॥
कुणी धाडसी, कुणी पिसे वा कुणी वीरवर त्यां गणती ॥ ५ ॥
फांशी ठरली तरी न फिरली देशहिताची दृष्टी ती ॥
राजकीय कट संबंधाला मुळीं न थारा ते देती ॥ ६ ॥
धन्य जाहला येरवड्याचा तुरुंग सज्जन संगतिनें ॥
शतनमनें त्या कालगतीला भला भरविला रंग तिनें ॥ ७ ॥
फांशी चढती प्राणपांखरूं देहापिंजऱ्यांतुनी उडे ॥
वीर कृतीनें राष्ट्रामाजी पराक्रमाचें तेज चढे ॥ ८ ॥

— १० —

कालासम ते पती हरपले बाला झाल्या त्या अबला ॥
सौभाग्याचा सुरम्य वाडा विद्युत्पातें हा दबला ॥ १ ॥
हे भगिनींनों असह्य संकट तरी कीर्तिकर समजावें ॥
वरुनी ज्ञाना, करुनी कीर्तिस देवि जानकीसम जावें ॥ २ ॥
मायाचि ती उपमा ना दुसरी अंबर भरवी हंबरडे ॥
तिघे गिळियले लाल तियेचें घोरतम किती यमनरडें ॥ ३ ॥

६७७८

त्यज शोकासी, रत्नें ऐशीं जननि निपजती तुझ्या कुशीं ॥
कीर्ति तयाची स्नुषा अमर तंव चुंबी हर्षे ऊठ कशी ॥ ४ ॥
पिता म्हणवितां पुत्रत्रयींचा निपुत्रिक कसा हो बनला ॥
किंवा विधिनें अननुभवें सुत-शोक सह्य कीं हा गणिला ? ॥ ५ ॥
अद्वितीय यश तिहीं जोडिलें देशपिते हे कुला भले ॥
शतांश त्यांच्या वृद्ध होउनी तुम्हां आम्हांला न लाभलें ॥ ६ ॥
अजरामर ते धन्य पुत्र तव कीर्तीरूपें लखलखती ॥
हरे ! असोनी मर्त्य जाहले अमर तथापी कां खंती ? ॥ ७ ॥
नररत्नांच्या वियोगयोगें पशुपक्ष्यादिक धाय रडे ॥
बलिदानाविण वीरांच्या परि राष्ट्रोद्धाराहि कसा घडे ॥ ८ ॥

REFBK-0006778

\- ११ -

स्वार्थी मारुनि लाथ; ठोकिला रँडा जनछलइ
परार्थ साधू श्रीचाफेकर योग्य कां न ते नमनाला ॥ १ ॥
राजकीय कट छळी देश त्या, पुढें होउनी नाशियला ॥
देशहितेच्छु श्रीचाफेकर योग्य कां न ते नमनाला ॥ २ ॥
प्राणांतींहि नाचि चिकटली असत्यवाणी वदनाला ॥
सत्यभाषणीं श्रीचाफेकर योग्य कां न ते नमनाला ॥ ३ ॥
नष्ट कराया तयार झाले द्रविड छळति जे सुजनाला ॥
अधमद्वेषी श्रीचाफेकर योग्य कां न ते नमनाला ॥ ४ ॥
आजन्मीं जे कधीं न ढळले जगत्प्रभूचे भजनाला ॥
भक्तशिरोमणि श्रीचाफेकर बंधु योग्य शत नमनाला ॥ ५ ॥
महाघोर भवपाश तोडिला माया शिवली न मनाला ॥
विरक्त पूर्णचि श्रीचाफेकर बंधु योग्य शत नमनाला ॥ ६ ॥

. . . ठाणें. स्थकमत.
अनुक्रम २९३४३ वि. ९१०५
१७
क्रमांक ....७३५८.... नों: दि: ३.५.१९.१५

प्राणां विटली परी न तुटली झटली जनहित करण्याला ॥
धन्यचि मैत्री, धन्य रानडे वीर युवकही नगनाला ॥ ७ ॥
पराक्रमाच्या तेजा तुमच्या त्रासुनि निंदिति जरि घुबडें ॥
वीरकथा तुमची ही गाइल पिढी पिढी नव पुढें पुढें ॥ ८ ॥

— १२ —

असोत अरिचे ठायीं जरि गुण अनुकरणीयचि जरि ठरती ॥
अभिमानास्पद तरि न गमावी स्वजनकीर्ति मज कां हो ती? ॥ १ ॥
भ्याले नाहीं काळालाही झटावया जनकार्यातें ॥
वचकावें मी काय म्हणोनी स्तवण्यासी त्या आर्यांतें ? ॥ २ ॥
विरुद्धपक्षी स्वयें वानिती जया धाडसी नररत्नां ॥
कृतज्ञ व्हाया, सद्‌गुण गाया भ्या न करावें कां यत्नां? ॥ ३ ॥
शतकामागें हेंच चमकतें तेज आज जे खुनी दिसे ॥
दिसे आंधळया, दुबळया, धूर्ता जें, तें बहुधा तसें नसे ॥ ४ ॥
वितंडवादी पंडित बनतो, साधुश्रेष्ठहि तो सोदा ।
नाना सद्‌गुण दुर्गुण ठरती, वक्रकाल हा हरि मोदा ॥ ५ ॥
अन्याय प्रवणांना दंडूं, रणीं पुढेंची पद ज्यांचें ॥
ठरति कसे अपराधी ते जे करिति दमन पर सत्तेचें ॥ ६ ॥
फांशी ना ती यज्ञवेदिका रक्तें न्हाली जी तुमच्या ! ! ॥
सांडुनि होवो त्याचि राष्ट्ररणिं सार्थक रक्ताचें अमुच्या ॥ ७ ॥
कार्य सोडुनी अपुरें पडलां झुंजत ? खंती नको ! पुढें ॥
कार्या चालवुं गिरवुनि तुमच्या पराक्रमाचे अम्हीं धडे ॥ ८ ॥

त्यज शोकासी, रत्नें ऐशीं जननि निपजती तुझ्या कुशीं ॥
कीर्ति तयाची स्नुषा अमर तंव चुंबी हर्षे ऊठ कशी ॥ ४ ॥
पिता म्हणवितां पुत्रत्रयीचा निपुत्रिक कसा हो बनला ॥
किंवा विधिनें अननुभवें सुत–शोक सह्य कीं हा गणिला ? ॥ ५ ॥
अद्वितीय यश तिहीं जोडिलें देशपिते हे कुला भले ॥
शतांश त्यांच्या वृद्ध होउनी तुम्हां आम्हांला न लाभलें ॥ ६ ॥
अजरामर ते धन्य पुत्र तव कीर्तीरूपें लखलखती ॥
हरे ! असोनी मर्त्य जाहले अमर तथापी कां खंती ? ॥ ७ ॥
नररत्नांच्या वियोगयोगें पशुपक्ष्यादिक धाय रडे ॥
बलिदानाविण वीरांच्या परि राष्ट्रोद्धाराहि कसा घडे ॥ ८ ॥

– ११ –

REFBK-0006778

स्वार्था मारुनि लाथ; ठोकिला रँडा जनछल[illegible]
परार्थ साधू श्रीचाफेकर योग्य कां न ते नमनाला ॥ १ ॥
राजकीय कट छळी देश त्या, पुढें होउनी नाशियला ॥
देशहितेच्छु श्रीचाफेकर योग्य कां न ते नमनाला ॥ २ ॥
प्राणांतींहि नाचि चिकटली असत्यवाणी वदनाला ॥
सत्यभाषणीं श्रीचाफेकर योग्य कां न ते नमनाला ॥ ३ ॥
नष्ट कराया तयार झाले द्रविड छळति जे सुजनाला ॥
अधमद्वेषी श्रीचाफेकर योग्य कां न ते नमनाला ॥ ४ ॥
आजन्मीं जे कधीं न ढळले जगत्प्रभूचे भजनाला ॥
भक्तशिरोमणि श्रीचाफेकर बंधु योग्य शत नमनाला ॥ ५ ॥
महाघोर भवपाश तोडिला माया शिवली न मनाला ॥
विरक्त पूर्णचि श्रीचाफेकर बंधु योग्य शत नमनाला ॥ ६ ॥

ठा. स्थळप्रत.
अनुक्रम २९३४३ वि.
क्रमांक ७३५८ नों: दि:

प्राणां विटली परी न तुटली झटली जनहित करण्याला ॥
धन्यचि मैत्री, धन्य रानडे वीर युवकही नमनाला ॥ ७ ॥
पराक्रमाच्या तेजा तुमच्या त्रासुनि निंदिति जरि घुबडें ॥
वीरकथा तुमची ही गाइल पिढी पिढी नव पुढें पुढें ॥ ८ ॥

— १२ —

असोत अरिचे ठायीं जरि गुण अनुकरणीयचि जरि ठरती ॥
अभिमानास्पद तरि न गमावी स्वजनकीर्ति मज कां हो ती ? ॥ १ ॥
भ्याले नाहीं काळालाही झटावया जनकार्यातें ॥
वचकावें मी काय म्हणोनी स्तवण्यासी त्या आर्यांतें ? ॥ २ ॥
विरुद्धपक्षी स्वयें वानिती जया धाडसी नररत्नां ॥
कृतज्ञ व्हाया, सद्‌गुण गाया म्या न करावें कां यत्नां ? ॥ ३ ॥
शतकामागें हेंच चमकतें तेज आज जे खुनी दिसे ॥
दिसे आंधळया, दुबळया, धूर्ता जें, तें बहुधा तसें नसे ॥ ४ ॥
वितंडवादी पंडित बनतो, साधुश्रेष्ठहि तो सोदा ।
नाना सद्‌गुण दुर्गुण ठरती, वक्रकाल हा हरि मोदा ॥ ५ ॥
अन्याय प्रवणांना दंडूं, रणीं पुढेंची पद ज्यांचें ॥
ठरति कसे अपराधी ते जे करिति दमन पर सत्तेचें ॥ ६ ॥
फांशी ना ती यज्ञवेदिका रक्तें न्हाली जी तुमच्या ! ! ॥
सांडुनि होवो त्याचि राष्ट्ररणिं सार्थक रक्ताचें अमुच्या ॥ ७ ॥
कार्य सोडुनी अपुरें पडलां झुंजत ? खंती नको ! पुढें ॥
कार्या चालवुं गिरवुनि तुमच्या पराक्रमाचे अम्हीं धडे ॥ ८ ॥